अति.महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.:- अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/प्र-५/ 9932
दिनांक:- 02/05/2024

## -: आदेश :-

**विषय :-** डॉ.राजकुमार विठ्ठलराव जाधव संचालक (प्राणीसंग्रहालय), स्व.राजीव गांधी प्राणीसंग्रहालय यांचे रजा कालावधीत त्यांचे पदाचे कामकाज व्यवस्थेबाबत.

**संदर्भ :-** १.उद्यान कार्यालयाकडील जा.क्र. उकाजा/३३९, दि.२५/०४/२०२४.
२.मा.अति.महापालिका आयुक्त(ज) यांचा ठराव क्र.१/ ३६ दि. ३०/०४/२०२४

पुणे महानगरपालिकेच्या स्वर्गीय राजीव गांधी प्राणीसंग्रहालयाकडील संचालक (प्राणीसंग्रहालय) (डायरेक्टर (झू)), वर्ग-१ या पदावर कार्यरत असलेले डॉ. राजकुमार विठ्ठलराव जाधव, हे कौटुंबिक कारणास्तव बाहेरगावी जाणार असल्याने त्यांनी दि.०१/०५/२०२४ ते दि.०५/०५/२०२४ अखेर(शासकीय सुट्यांना जोडून) पर्यंत पाच दिवसांची हक्काची रजा मिळणेस व सदर रजा कालावधीत मुख्यालय सोडणेस संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये उद्यान विभागाकडून कळविण्यात आले आहे. त्यास मा. अति. महापालिका आयुक्त(ज) यांची संदर्भ क्र.२ चे ठरावान्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

डॉ. राजकुमार विठ्ठलराव जाधव, संचालक (प्राणीसंग्रहालय) (डायरेक्टर (झू)), वर्ग-१ यांचे हक्काचे रजा कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त पदभार श्रीमती सारीक फुंडे, मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

उपरोक्त अधिकारी यांनी स्वत:चे पदाचे कामकाज सांभाळून उपरोक्तप्रमाणे अतिरिक्त कामकाज त्यांचे रजा कालावधीत करावयाचे आहे.

उपरोक्तप्रमाणे अतिरिक्त पदभार स्विकारलेबाबतचे निवेदन आमचेकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

(रविंद्र बिनवडे)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
30/4/2024

प्रत :-

खातेप्रमुख (सर्व), पुणे महानगरपालिका.
यांजकडेस माहिती व पुढील तजविजीसाठी . . .